# पुणे विद्यापीठ

दूरध्वनी क्रमांक :
०२०-२५६०१२०६
२५६०१२०१
२५६०१२०२
फॅक्स : ०२०-२५६९१३४१

परीक्षा विभाग
गणेशखिंड, पुणे ४११ ००७

Website : www.unipune.ernet.in
E-mail : coe@unipune.ernet.in

## अत्यंत महत्वाचे

संदर्भ : परीक्षा/समन्वय/२६५ दिनांक : २५ फेब्रुवारी, २०१०

प्रति,
मा.प्राचार्य,
सर्व संलग्नित कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालये.

**विषय : प्रथम वर्ष बी.बी.ए./बी.सी.ए./बी.बी.एम.(आय.बी.)(जुना बी.एफ.टी.) या परीक्षा महाविद्यालयाकडे वर्ग करण्याबाबत.**

महोदय / महोदया,

विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार, आपणांस कळविण्यात येते की, बी.बी.ए./बी.सी.ए./बी.बी.एम.(आय.बी.)(जुना बी.एफ.टी.) या अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्ष (प्रथम व व्दितीय सत्र) परीक्षांच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यमापन, तसेच प्रात्यक्षिक परीक्षा महाविद्यालयाकडे वर्ग करण्यात येत आहेत. सदर परीक्षा महाविद्यालयाकडे वर्ग केल्यानंतर करावयाच्या कामाकाजाच्या सविस्तर सूचना सोबत जोडलेल्या आहेत. या निर्णयाची अंमलबजावणी शैक्षणिक वर्ष २०१०-११ पासून करण्यात यावी.

आपणांस विनंती की, या पत्राचा आशय सर्व संबंधित शिक्षक, शिक्षकेतर सेवक, विद्यार्थी व इतर संबंधितांच्या निदर्शनास आणून द्यावा.

कळावे,

आपला विश्वासू,

(डॉ.शि.मो.आहिरे)
प्रभारी परीक्षा नियंत्रक

**सोबत : वरीलप्रमाणे.**

**संदर्भ : विद्यापरिषद ठराव क्र.वि.प.अ ५ पीए/३१०/२००९, दिनांक ३० नोव्हेंबर, २००९.
व्यवस्थापन परिषद ठराव क्र. ४९ प्रवअ ५९/१५०२१०, म : ६०/१५०२१०.**

# पुणे विद्यापीठ

## प्रथम वर्ष परीक्षा महाविद्यालयाकडे वर्ग केल्यानंतरच्या कामकाजाची कार्यपध्दती

बी.बी.ए., बी.सी.ए., बी.बी.एम (आय.बी.)(जुना बी.एफ.टी.) या अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्ष (प्रथम व व्दितीय सत्र) परीक्षांच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यमापन तसेच प्रथम वर्षाच्या प्रात्यक्षिकांची परीक्षा शैक्षणिक वर्ष २०१०-२०११ पासून महाविद्यालयाकडे सोपविण्याबाबत निर्णय घेण्यात आलेला असून सदर परीक्षा महाविद्यालयाकडे वर्ग केल्यानंतर करावयाच्या कामकाजाबाबतच्या सविस्तर सूचना/कार्यपध्दती खालीलप्रमाणे राहील.

### (१) विद्यापीठाने करावयाची कामे :

१) परीक्षांची कार्यक्रमपत्रिका (Schedule of Examinations) जाहीर करणे.
२) महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४, कलम ३२ (५) (अ) अन्वये सभांचे आयोजन करुन प्राश्निकांच्या नियुक्त्या करणे.
३) प्राश्निकांच्या सभा आयोजित करुन प्रश्नसंच तयार करुन घेणे.
४) परीक्षेचे वेळापत्रक जाहीर करणे.
५) प्रश्नपत्रिकांची छपाई करुन त्या संबंधित महाविद्यालयांना वेळेत पोहोचविणे.
६) परीक्षा निकोप वातावरणात पार पाडण्यासाठी दक्षता पथकांची नेमणूक करणे.
७) परीक्षेचा निकाल तयार करण्याच्या प्रक्रियेबाबत महाविद्यालयातील प्रतिनिधींची जिल्हावार कार्यशाळा आयोजित करणे.
८) प्रथम वर्षाच्या परीक्षा व त्यांच्या उत्तरपत्रिका तपासण्याचे कामकाज व्दितीय व तृतीय वर्षाच्या परीक्षा सुरु होण्याच्या आधी पूर्ण करण्यासाठी, प्रथम व्दितीय व तृतीय वर्ष परीक्षांची कार्यक्रमपत्रिका त्यानुसार तयार करणे.

### (२) महाविद्यालयाने करावयाची कामे :

१) शैक्षणिक पात्रता तपासून विद्यापीठ नियमाप्रमाणे विद्यार्थ्यांना प्रवेश देणे.
२) उपस्थिती व तद्नुषंगिक बाबी विचारात घेऊन सत्रपूर्तता (Term Grant) करणे.
३) पात्र विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज भरुन घेऊन विद्यार्थ्यांना महाविद्यालयाचा आसन क्रमांक देणे, विषयवार समरी करुन विद्यार्थ्यांना परीक्षेच्या वेळापत्रकानुसार परीक्षेचे प्रवेशपत्र देणे, विद्यार्थ्यांची परीक्षेची बैठक

व्यवस्था करणे, इत्यादि. सदर विद्यार्थ्यांना कायम नोंदणी क्रमांक (PRN) देण्यात येऊ नये.

४) परीक्षेसाठी महाविद्यालयाचे नांव व अनुक्रमांक असलेल्या उत्तरपत्रिका छापून घेणे व त्यांचा वापर परीक्षेसाठी करणे.

५) विषयनिहाय विद्यार्थी संख्या विद्यापीठास मुदतीत कळविणे व त्याप्रमाणे प्रश्नपत्रिका विद्यापीठाकडून स्वीकारणे.

६) परीक्षा आयोजनासाठी नियमानुसार संबंधितांच्या नेमणूका करणे.

७) परीक्षा आयोजनासाठी अंतर्गत वरिष्ठ पर्यवेक्षक तसेच बहि:स्थ वरिष्ठ पर्यवेक्षक नियुक्त करणे. संबंधित प्राचार्यांनी अन्य संस्थेच्या महाविद्यालयाच्या प्राचार्यांशी संपर्क साधून वरिष्ठ महाविद्यालयातील कमीत कमी पाच वर्षाचा शिकविण्याचा अनुभव असलेल्या शिक्षकास बहि:स्थ वरिष्ठ पर्यवेक्षक म्हणून नियुक्त करणे. अंतर्गत वरिष्ठ पर्यवेक्षकास पाच वर्षे शिकविण्याची अट शिथिलक्षम राहील.

८) परीक्षेच्या वेळापत्रकानुसार लेखी व प्रात्यक्षिक परीक्षेचे आयोजन करणे.

९) महाविद्यालय आवारात उत्तरपत्रिका संबंधित पात्र विषय शिक्षकाकडून तपासून घेणे.

१०) संबंधित महाविद्यालयाने विद्यापीठ नियमांनुसार परीक्षेचा निकाल मुदतीत जाहीर करणे.

११) गुणपत्रकांवर महाविद्यालयाचे नांव, आय.डी. क्रमांक, तसेच विद्यापीठाचा लोगोसह छापून घेणे व त्या विद्यार्थ्यांना निकालानंतर देणे.

१२) तपासलेल्या उत्तरपत्रिका निकाल जाहीर झालेल्या तारखेपासून पुढे सहा महिन्यापर्यत जतन करुन ठेवणे.

१३) फेरतपासणी व पुनर्मूल्यांकन तसेच उत्तरपत्रिकेची छायांकित प्रत, विद्यापीठ नियमाप्रमाणे शुल्क आकारुन देणे.

१४) विद्यार्थ्यांना दुय्यम (Duplicate) गुणपत्रक देणे, इत्यादि.

१५) विद्यापीठ परीक्षेसाठी केंद्र मान्यतेचा प्रस्ताव व्दितीय वर्षासाठी (परिपत्रक ३०३, दिनांक ८ सप्टेंबर, २००८नुसार ) सादर करणे.

१६) परीक्षांचे आयोजन, मूल्यमापन, स्टेशनरी इत्यादि विविध कामांसाठी करावा लागणारा खर्च, विद्यापीठाच्या प्रचलित नियमानुसार महाविद्यालयाने परीक्षा शुल्क व इतर शुल्कातील महाविद्यालयाच्या हिस्स्यातून करावयाचा आहे. महाविद्यालयाच्या हिस्स्याची रक्कम महाविद्यालयाने ठेवून घ्यायची असून उरलेल्या विद्यापीठाच्या हिस्स्याची रक्कम विद्यापीठाकडे पाठवावयाची आहे.

महाविद्यालयाचा व विद्यापीठाचा हिस्सा खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | शुल्काचे वर्णन | शुल्क | महाविद्यालयाचा हिस्सा | विद्यापीठाचा हिस्सा |
|---|---|---|---|---|
| १. | परीक्षा अर्जाची किंमत | रु. ३०/- | रु. २०/- | रु. १०/- |
| २. | परीक्षा शुल्क | | | |
| | प्रथम वर्ष अ) बी.बी.ए. : सत्र - १<br>सत्र - २<br>प्रोजेक्ट | रु. ९८०/-<br>रु. ९८०/-<br>रु. ४००/- | रु. ६००/-<br>रु.६००/-<br>रु.२४५/- | रु. ३८०/-<br>रु.३८०/-<br>रु.१५५/- |
| | ब) बी.सी.ए. : सत्र - १<br>सत्र - २ | रु. ९८०/-<br>रु. ९८०/- | रु. ६००/-<br>रु.६००/- | रु. ३८०/-<br>रु.३८०/- |
| | क) बी.बी.एम : सत्र - १<br>(आय.बी.) सत्र - २<br>प्रोजेक्ट | रु. ९८०/-<br>रु. ९८०/-<br>रु. ४००/- | रु. ६००/-<br>रु.६००/-<br>रु.२४५/- | रु. ३८०/-<br>रु.३८०/-<br>रु.१५५/- |
| ३. | केंद्रीय मूल्यमापन प्रकल्प | रु. १०५/- | रु. ६५/- | रु. ४०/- |
| ४. | गुणपत्रक | रु. १०५/- | रु. ६५/- | रु. ४०/- |
| ५. | गुणपडताळणी व पुनर्मूल्यांकन अर्जाची किंमत | रु. ३०/- | रु. २०/- | रु. १०/- |
| ६. | गुणपडताळणी व पुनर्मूल्यांकन शुल्क | रु. ४००/- | रु. २४५/- | रु. १५५/- |
| ७. | उत्तरपत्रिका छायांकित प्रत अर्जाची किंमत | रु. ३०/- | रु. २०/- | रु. १०/- |
| ८. | उत्तरपत्रिका छायांकित प्रत शुल्क | रु. ३३०/- | रु. २००/- | रु. १३०/- |
| ९. | गुणपत्रक दुय्यम प्रत | रु. १०५/- | रु. ६५/- | रु. ४०/- |

परीक्षा अर्जाची किंमत, परीक्षा शुल्क, केंद्रीय मूल्यांकन शुल्क व गुणपत्रक शुल्क या सर्व शुल्कांचा सर्व विद्यार्थ्यांचा विद्यापीठाच्या हिस्स्याचा एकत्रित धनाकर्ष (Demand Draft) विद्यापीठाकडे नेहमीच्या पध्दतीने व्दितीय वर्षाचे परीक्षा अर्ज जमा करताना पाठवावा. अनुक्रमांक ५ ते ९ बाबतचे विद्यापीठाच्या हिस्स्याचे शुल्क संबंधित परीक्षा सत्राच्या शेवटी विद्यापीठाकडे पाठविणे बंधनकारक आहे.

## (३) शैक्षणिक वर्ष २००९- २०१० व तत्पूर्वी प्रवेशित विद्यार्थ्यांबाबत :

शैक्षणिक वर्ष २०१०-२०११ मधील ऑक्टोबर २०१० च्या परीक्षांपासून प्रथम वर्ष बी.बी.ए., बी.सी.ए., बी.बी.एम (आय.बी.)(जुना बी.एफ.टी.) या अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांची (पूर्वीच्या अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांसह) प्रथम सत्र व व्दितीय सत्राची परीक्षा सर्व संबंधित महाविद्यालयाने आयोजित करावयाची आहे. शैक्षणिक वर्ष २००९- २०१० व त्यापूर्वीच्या ज्या पुर्नपरीक्षार्थींची (Repeater Students) परीक्षा

विद्यापीठाने घेतली होती त्या विद्यार्थ्यांची सत्र १ व सत्र २ मधील ज्या विषयांचा अनुशेष (Backlog) आहे, त्या विषयांची परीक्षा देखील संबंधित महाविद्यालयाने आयोजित करावयाची आहे. अशा सर्व विद्यार्थ्यांचे गुणपत्रक संबंधित महाविद्यालयाने द्यावयाची आहेत. पुर्नपरीक्षार्थींना (Repeater Students) गुणपत्रक देताना, विद्यापीठाने तत्पूर्वी घेतलेल्या परीक्षेत विद्यार्थी ज्या विषयांमध्ये उत्तीर्ण असेल त्या विषयाचे गुण हे विद्यापीठाने महाविद्यालयास दिलेल्या निकालपत्रकाच्या (College Ledger) आधारे घेऊन संबंधित विद्यार्थ्याच्या गुणपत्रिकेत समाविष्ट करुन दाखविण्यात यावेत व त्यानुसार संबंधित विद्यार्थ्याचा निकाल जाहीर करण्यात यावा.

ज्या महाविद्यालयामध्ये मान्यताप्राप्त प्राचार्य नाहीत, आवश्यक त्या प्रमाणात मान्यताप्राप्त प्राध्यापकांची पदे भरलेली नाहीत व परीक्षा घेण्यासाठीच्या पायाभूत सुविधा उपलब्ध नाहीत अशा महाविद्यालयांना परीक्षा केंद्र असणार नाही. अशा महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची सोय लक्षात घेवून नजिकच्या महाविद्यालयाकडे परीक्षेची सर्व व्यवस्था सोपविण्यात येईल. संबंधित महाविद्यालयांनी याची नोंद घेऊन त्यानुसार विद्यापीठ कार्यालयास वेळीच कळविणे आवश्यक आहे.

वरील कार्यपध्दतीचा अवलंब करुन परीक्षा व तद्‌संबंधित इतर कामे व्यवस्थित पार पाडण्यात यावीत, ही विनंती.


(डॉ.शि.मो.आहिरे)
प्रभारी परीक्षा नियंत्रक


गणेशखिंड, पुणे ४११ ००७. }
दिनांक : २५ फेब्रुवारी, २०१० }